# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांक:27.03.2026 वारः शुक्रवार

---

1. देशात कच्चं तेल आणि पेट्रेलियम पदार्थांचा 60 दिवसांचा साठा; पेट्रोल, डिझेल, एलपीजीचा देशात तुटवडा नाही-केंद्र सरकारचा पुनरुच्चार
2. पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाला गती देण्याबाबत राज्य सरकारचा शासन आदेश जारी
3. राज्यात सर्वत्र श्रीरामनवमी उत्साहात साजरी आणि
4. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**सरकार-इंधन**

देशात पेट्रोलियम आणि एलपीजीचा पुरवठा पूर्णपणे सुरक्षित असून, परिस्थिती नियंत्रणात असल्याचं केंद्र सरकारनं काल पुन्हा एकदा स्पष्ट केलं. देशात 74 दिवसांचं इंधन साठवण्याची क्षमता असून, सध्या कच्चं तेल आणि अन्य पेट्रोलियम उत्पादनांचा सुमारे 60 दिवसांचा साठा आहे, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं सांगितलं. देशभरातील सर्व किरकोळ विक्री केंद्रांवर इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध असून पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीची कोणतीही टंचाई नाही, असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी; राज्य सरकारांशी समन्वय साधून व्यावसायिक सिलिंडरचे वाटप 50 टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आलं आहे. काही समाज विघातक घटकांकडून जाणीवपूर्वक काही अफवा पसरवण्यात येत आहेत; अशा चुकीच्या आणि दिशाभूल करणाऱ्या अफवांवर विश्वास ठेवू नये; आणि घाबरून जाऊन इंधनाची अतिरिक्त साठवणूक करू नये, असं आवाहन सरकारनं केलं आहे.

**केरोसीन**

आखाती देशांमधल्या युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेत राज्य सरकारनं पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी 37 लाख 44 हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार राज्यात मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये तिन्ही सरकारी तेल कंपन्यांकडून प्रत्येक शिधापत्रिकेमागे 3 लिटर केरोसीनचं वाटप केलं जाणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही, अशी कुटुंब देखील केरोसीनच्या उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील. एकूण वाटपाच्या 85 टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात वितरित करण्याचे आदेश राज्य सरकारने जारी केले आहेत.

**रामनवमी**

राज्यासह देशभरात काल श्रीरामनवमी अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. ठीकठिकाणच्या राम मंदिरांमध्ये काल दुपारी बारा वाजता रामजन्म सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. सर्वच मंदिरांना आकर्षक रोषणाई करण्यात आली आहे.

नागपूरमध्ये रामनवमी निमित्त काढलेल्या मिरवणुकीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह अन्य मान्यवरांनी भाग घेतला. नाशिकच्या श्री काळाराम मंदिरातही काल ढोल

ताशांच्या गजरात श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव साजरा करण्यात आला. पारंपरिक वेशतील महिलांनी यावेळी पाळणा गीते सादर केली.

शिर्डीच्या श्री साई बाबा मंदिरात आणि शेगाव इथल्या श्री गजानन महाराज संस्थानातही काल राम नवमीचा उत्साह पाहायला मिळाला. पुणे, सांगली, सातारा, अकोला, यवतमाळ आणि धाराशिवसह अन्य शहरांमध्येही पालखी, मिरवणूक, दुचाकी यात्रा, भजन कीर्तन यासारखे सांस्कृतिक कार्यक्रम तसंच रक्तदान शिबिर, स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सत्कार, असे सामाजिक कार्यक्रम काल घेण्यात आले. उत्तर प्रदेशत अयोध्येमध्ये रामनवमीचा उत्साह असून, श्रीराम मंदिरात आज होणारा सूर्य स्नान सोहळा भविकांचं प्रमुख आकर्षण असेल.

**<u>चैत्रोत्सव</u>**

देवीच्या साडे तीन शक्तीपीठांपैकी अर्धे पीठ असलेल्या, नाशिक जिल्ह्यातल्या श्री सप्तश्रृंगी देवीच्या चैत्रोत्सवाला काल उत्साहात प्रारंभ झाला. 2 एप्रिलपर्यंत हा उत्सव सुरू राहणार आहे.

**<u>जयसिंगराव पवार निधन-कोल्हापूर</u>**

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या पार्थिव देहावर काल कोल्हापूरमध्ये शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात लोककल्याणकारी राज्य निर्माण करुन राज्याची घडी, आधुनिक जीवन मूल्यांनुसार बसवली, हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलू पवार यांनी प्रकाशात आणला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही मराठ्यांचा लढा सुरु ठेवणाऱ्या, तसंच करवीर संस्थानच्या संस्थापिका महाराणी ताराराणींचं चरित्र पवार यांनी लिहिलं. अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक-सदस्य आणि काही काळ अध्यक्ष होते. त्यांनी महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी या संस्थेची स्थापना केली होती. डॉ. जयसिंगराव पवार यांचं काल कोल्हापूर इथं निधन झालं, ते 85 वर्षांचे होते. त्यांच्या निधनानं तत्वनिष्ठ, व्यासंगी आणि संशोधक हरपला आहे अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना आदरांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही डॉक्टर जयसिंगराव पवार यांच्या निधनाबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या काही भागात सध्या ढगाळ वातावरण आहे, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या अनेक भागांमध्ये काल अवकाळी पावसाने हजेरी लावली. येत्या दोन दिवसात विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात इतरत्र हवामान कोरडं राहील. येत्या 30 मार्चला राज्यातील काही भागांमध्ये वादळी वारे आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अंदाजांकडे लक्ष ठेऊन शेतीच्या कामांचं नियोजन करावं, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.**